ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख २० जानेवारी, १९६० अंक ३

## विविध माहिती

**फोर्ड फौंडेशनची मदत**—१९५९ सालीं अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशन ह्या संस्थेनें आशिआ, आफ्रिका व इतर कांहीं मागासलेले देश ह्यांमधील आर्थिक विकासांच्या योजनांना १,५२,५०,००० डॉलर्स मंजूर केले. ह्या मदतीचा लाभ १६ देशांना झाला. त्यांत भारतहि आहे. भारताला फोर्ड फौंडेशन-कडून २५ लाख डॉलर्सची मदत मिळाली.

**साखरेचा सहकारी कारखाना**—नगर जिल्ह्यांतील श्रीगोंदे तालुक्यांतील ऊंस पिकविणाऱ्या १,००० शेतकऱ्यांनीं सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा साखरेचा कारखाना काढण्याचा निर्णय घेतला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या कारखान्याचा समावेश करावा अशी मागणी त्यांनीं मुंबई सरकारकडे केली आहे.

**पोलाद करण्याची नवी पद्धत**—रूरकेला येथील पोलादा-च्या कारखान्यांतील पोलादाचें वार्षिक उत्पादन १० लाख टन होईल. त्यांपैकीं ७,५०,००० टन पोलाद एका नव्या पद्धतीनें उत्पादन करण्यांत येईल. ही पद्धत ऑस्ट्रिआंत चालू असून तीमुळें भांडवली खर्च व नित्याचा उत्पादनखर्च ह्यांच्यांत बचत होईल. शिवाय, उत्पादनाचा वेगहि इतर पद्धतींपेक्षा अधिक राहील.

**विकासकार्याची नवीन दिशा**—ग्रामीण भागांतील लोकांना त्यांच्या उपयोगीं पडेल असें औद्योगिक शिक्षण देण्याची योजना मध्यवर्ती सरकारनें आंखली आहे. ह्या योजनेप्रमाणें शेतकऱ्यांना लागणारीं निरनिराळया प्रकारचीं अवजारें करण्याचें शिक्षण खेड्यांत उघडण्यांत यावयाच्या वर्कशॉप्समधून देण्यांत येईल. शाळा, पंचायती व सहकारी संस्था ह्यांच्यामार्फत योजना कार्यान्वित करण्यांत येईल.

**जपानमधील भूकंप**—जपानमध्यें दरसाल सुमारें ६,००० ते ७,००० भूकंपाचे छोटे मोठे धक्के बसतात. म्हणजे निरनिराळया भागांत मिळून रोज २० भूकंपाचे धक्के बसतात. ह्या धक्क्यांचें सर्वांत अधिक भय पत्रकारांना असतें. कारण, जपान-मधील बहुतेक वृत्तपत्रांच्या कचेऱ्या ६ व्या अगर ७ व्या मजल्यावर असतात.

**आस्वान धरणाचा नमुना**—ईजिप्तमध्यें आस्वान येथें बांधण्यांत येत असलेल्या प्रचंड धरणाची छोटी प्रतिकृति मॉस्को येथील धरणविषयक संशोधनकेंद्रांत करण्यांत आली आहे, पाण्याच्या प्रवाहाचा वेग, काढण्यांत येणाऱ्या कालव्याची दिशा, व पाण्याचे भूमिगत बोगदे ह्या बाबींविषयीं संशोधन करण्यांत येत आहे. हें धरण दगड व चिखल ह्यांचे बांधतां येईल असा निष्कर्ष रशिअन तज्ज्ञांनीं काढला आहे.

**राजकोट भागांतील विजेचा पुरवठा**—राजकोट भागांतील विजेच्या पुरवठ्यांत वाढ करण्याच्या दृष्टीनें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत नव्या कामांचा समावेश करण्यांत येणार आहे. उद्योगधंद्यांची, विशेषतः छोटया उद्योगधंद्यांची वाढ करण्याच्या दृष्टीनें हीं कामें हातीं घेण्यांत येणार आहेत. विजेचा पुरवठा झाल्यास नवे उद्योगधंदे काढतां येतील असें पाहणीवरून आढळून आलें आहे.

**आयुर्विमा कॉर्पोरेशनची नवी कचेरी**—भारताच्या आयुर्विमा कॉर्पोरेशननें हॉंगकॉंग येथें आपली कचेरी उघडण्याचा निर्णय घेतला आहे. विम्याच्या धंद्यांचें राष्ट्रीयीकरण झाल्यावर परदेशांत उघडण्यांत येणारी ही पहिलीच कचेरी आहे. ह्यापूर्वीं भारताला आयुर्विम्याचा कांहीं धंदा आफ्रिकेंतून मिळत असे.

**वीज-पुरवठ्यासाठीं धरण**—अकोल्यापासून १८ मैलांवर पारस ह्या ठिकाणीं माण नदीवर वीजनिर्मितीसाठीं एक धरण बांधण्यांत येणार आहे. ह्या धरणाच्या पायाभरणीचा समारंभ नुकताच झाला. विदर्भाला अधिक वीज पुरविण्याच्या योजनेचा वरील धरण एक भाग आहे. सर्व योजनेला मिळून ३·५ कोटी रुपये खर्च येईल. योजना हिंदी एंजिनिअर पार पाडणार आहेत.

**तिरुचिरापल्लीचा विमानतळ**—तिरुचिरापल्ली येथील विमानतळाची सुधारणा करण्यासाठीं १२ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. विमानतळावर कॉंक्रीटची एक नवी घसरपट्टी नुकतीच पुरी करण्यांत आली आहे. तिची एकूण लांबी ६,००० फूट आहे, व रुंदी १५० फूट आहे. लांबीपैकीं ४,४०० फूट पट्टी तयार होऊन वापरण्यास प्रारंभ झाला आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेडला १९५९ सालीं सर्व खर्च भागून, नोकरवर्गास बोनस देण्यासाठी रुपये १,०५,००० ची तरतूद करून, नोकरवर्गाच्या ग्रॅच्युयटी फंडास रुपये १,००,००० वर्ग करून व इतर आवश्यक व नित्याच्या तरतुदी करून (ऑडिट होण्याचे अगोदर) निव्वळ नफा रुपये ७,७४,००० इतका झाला. मागील वर्षाचे नफ्यापेक्षा ही रक्कम रुपये २,१७,००० नें अधिक आहे. १९५८ सालांतील पुढें ओढलेली नफ्याची रक्कम रु. ३९,००० यांत मिळविली असतां एकूण रु. ८,१३,००० इतका नफा वांटणी करण्यासाठी उपलब्ध होतो. त्याची विभागणी पुढीलप्रमाणें करण्याचें संचालकांनीं योजिलें आहे :—

| | रुपये |
|---|---|
| इनकमटॅक्स व सुपरटॅक्ससाठी तरतूद | ३,४०,००० |
| रिझर्व्ह फंडांत जमा करणें | १,६०,००० |
| शेअर्सवर ९ टक्के करपात्र प्रो-रेटा डिव्हिडंड देण्यासाठी (अंदाजें) | २,७५,००० |
| ही रक्कम पुढील वर्षाच्या नफ्यांत मिळविली जाईल. | ३८,००० |
| एकूण | ८,१३,००० |

बँकेनें १९५८ साठी द. सा. द. शें. ६॥ टक्के करमाफ डिव्हिडंड दिले होते. १९५९ सालासाठी द. सा. द. शें. ९ टक्के करपात्र (इनकमटॅक्सचे नवीन नियमांस अनुसरून) डिव्हिडंड देण्याचें संचालकांनीं योजिलें आहे. कर वजा जातां हा दर ६·३० इतका पडतो. ठेवींत या वर्षी २॥ कोटींचे वर वाढ होऊन त्यांची रक्कम रु.१०,५६,०००वरून रु. १३,२५,००० वर गेली. खेळतें भांडवल रु. १२,३१,००,००० वरून रु.१५,५७,००,००० वर गेलें. संकलित नफावांटणीनंतर बँकेची एकूण गंगाजळी १४,६०,००० रुपये (विकी केलेल्या भागांवरील वाढाव्याची रक्कम धरून) होईल.

---

**भारत-हंगेरी व्यापारी करार**—भारत व हंगेरी ह्यांच्या दरम्यान अस्तित्वांत असलेल्या व्यापारी कराराची मुदत ६ महिन्यांनीं वाढविण्यांत आली आहे. आतां हा करार १९६० च्या जून अखेर चालू राहील. हंगेरी भारतापासून लोखंडाची माती, तांब्याचा माल, वनस्पति तेलें, कॉफी, अभ्रक, इत्यादि माल घेतो. उलट, भारत हंगेरीपासून यांत्रिक हत्यारें, रंग औषधें इत्यादि माल घेतो.

**दीग येथील जुने राजवाडे**— राजस्थानांतील दीग ह्या ठिकाणीं असलेले जाट राजांचे जुने राजवाडे फारसे प्रसिद्ध नाहींत. ह्या राजवाड्यांमधील पुष्कळसें बांधकाम आग्रा व दिल्ली येथील मोंगल बादशहांचे राजवाडे लुटून त्यांत मिळालेल्या सामानानें बांधलेले आहेत. तरी पण बांधकामाची एक विशिष्ट शैली त्यांच्यांत दिसून येते. ह्या राजवाड्यांसंबंधीं एक माहिती पुस्तक तयार करण्यांत येणार आहे.

**कॅन्सरवर औषध**—रशिअन शास्त्रज्ञांनीं एका प्रकारच्या झाडाच्या सालीपासून कॅन्सर बरा करणारें औषध शोधून काढल्याची बातमी आहे. ह्या औषधाचा प्रयोग प्राण्यांवर करण्यांत आला असून, आतां तो कॅन्सरच्या रोग्यांवरहि करण्यांत येणार आहे. कॅन्सरच्या रोग्यांपैकी सर्वांनाच असाध्य प्रकारचा कॅन्सर झालेला नसतो असें रशिअन संशोधकांचें मत आहे.

## हिंदुस्थान मशीन टूल्सच्या विस्ताराची योजना

बंगलोर येथील मशीन टूल्स लि. कारखान्याचा विस्तार करण्याची योजना भारत सरकारनें आंखली आहे. सध्यां ह्या कारखान्यांत दरसाल १,००० मशीन टूल्स तयार होतात. विस्ताराच्या योजनेंत दरसाल २,००० मशीन टूल्सचें उत्पादन करण्याची व्यवस्था आहे. कारखान्याचा विस्तार करण्यासाठी २८० लाख रुपये भांडवल लागणार आहे. त्यापैकी ११५ लाख रुपये परदेशीय चलनांत लागणार आहे. गेल्या कांहीं वर्षांत हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्यांतील उत्पादन बऱ्याच प्रमाणांत वाढलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत कारखान्याच्या उत्पादनाचें उद्दिष्ट ४०२ मशीन टूल्स ठरविण्यांत आलें होतें. परंतु हें उद्दिष्ट १९५७-५८ सालींच गांठण्यांत आलें. उत्पादन केलेल्या मालाची किंमत १·४ कोटी रुपये झाली. ठरलेल्या वेळेपेक्षा तीन वर्षे आधींच कारखान्यानें उद्दिष्ट गांठलें. कारण, कारखान्यांतील कामाच्या पाळ्यांची त्यासाठी पुनर्घटना करण्यांत आली होती. १९५९-६० ह्या वर्षांत सुमारें ७०० मशीन टूल्सचें उत्पादन करण्यांत येईल व त्यांची किंमत २·५ कोटी रुपये होईल. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस १,००० मशीन टूल्सचें उत्पादन होईल व त्याची किंमत ३॥ कोटी रुपयांच्या घरांत जाईल असा अंदाज आहे. १९६३ सालीं विस्ताराची योजना पूर्ण होईल व २,००० मशीन टूल्सचें उत्पादन होऊं लागेल. ह्या उत्पादनाची किंमत दरसाल ७ कोटी रुपये होईल. कंपनीला आतां नफा उरूं लागलेला आहे. सरकारच्या कर्जावरील व्याज व शेअर्सवर वाजवी नफा देऊनहि कंपनी विस्ताराच्या कामापैकी कांहीं कामाचा आर्थिक बोजा उचलूं शकेल.

---

## मुंबई सरकारचा विक्री-कर कायदा, १९५९

श्री. रा. कृ. देशपांडे, बी. ए., बी. कॉम., जी. डी. सी. ए., (इनकमटॅक्स व सेल्स टॅक्स सल्लागार आणि सहकारी सोसायट्यांचे व पब्लिक ट्रस्टसचे सर्टिफाईड ऑडिटर) ह्यांनीं जानेवारी १९६० पासून अंमलांत आलेल्या नव्या विक्रीकर कायद्याची व नियमांची माहिती देणारें हें सुबोध पुस्तक लिहून प्रकाशित केलें आहे. लेखकानें पुस्तकाचें दोन भाग केले आहेत. पहिल्या भागांत पूर्वेतिहास व कायद्याची रूपरेषा, कराचा बोजा व कराची आकारणी, विक्रीकर अधिकारी व ट्रिब्युनल, नोंदणी, लायसेन्स, अधिकारपत्र, मान्यतापत्र, परवाना, पत्रकें, कराची आकारणी, कराचा भरणा, दंड, कर वसूल व ड्रॉ बॅक, वजावट, रिफंड, हिशेब सादर करण्याची व माहिती पुरविण्याची जबाबदारी, कामकाज, अपराध व शास्ता, हीं प्रकरणें आहेत. दुसऱ्या भागांत करमाफ व करपात्र मालाचीं पांच परिशिष्टें दिलीं आहेत. आद्याक्षराप्रमाणें परिशिष्टांतील सर्व वस्तूंची नामावलि देण्यांत आली आहे. मुख्य फॉर्म्सच्या नमुन्यांचे क्रमांक, कागदपत्रें वगैरे दाखल करण्यास मुदत मर्यादा, फी दाखविणारा तक्ता, इत्यादिहि प्रकरणें आहेत. कायद्याचे पक्के नियम प्रसिद्ध झाले, ते सर्व लक्षांत घेऊनच पुस्तक तयार करण्यांत आलें असल्यामुळें तें अद्यावत् झालें आहे. श्री देशपांडे ह्यांचें हें पुस्तक विक्रीकराशीं संबंध येणाऱ्या सर्वांना मार्गदर्शक होईल आणि त्यांचें काम सुकर करील, अशी खात्री आहे. ह्या कराच्या बाबतींत तज्ज्ञ सल्लागार म्हणून ते दीर्घकाळ काम करीत असल्यानें, त्यांच्या पुस्तकास विशेष महत्त्व आहे. कारण, त्यांचा दृष्टिकोन व्यावहारिक स्वरूपाचा आहे.

किंमत : १ रु. ५० न. पैसे.

पत्ता : १८०, बुधवार, गुमास्ते बिल्डिंग, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. २० जानेवारी, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


### अमेरिकन उद्योगपतींना जागे राहण्याचा इशारा

अमेरिकेंतील व्यापाऱ्यांचें एक प्रतिनिधिमंडळ दक्षिण भारताचा दौरा करून नुकतेंच अमेरिकेंत परत गेलें. प्रतिनिधि-मंडळातर्फे बॉस्टन येथें अमेरिकन धंदेवाल्यांची एक बैठक भरविण्यांत आली होती. ह्या बैठकींत अमेरिकन उद्योग-पतींनीं कांहीं महत्त्वाचा सल्ला दिला. मंडळाचे अध्यक्ष म्हणाले कीं, अमेरिकन उद्योगपतींनीं भारतांत आपल्या कंपन्यां-च्या उपकंपन्या काढण्यांत फायदा आहे, हें लक्षांत घेऊन ह्या कामीं अधिक आस्था दाखविली पाहिजे. भारतांत भांडवल गुंतविण्याच्या बाबतींत अमेरिकन भांडवलदारांनीं वेळींच जागे झालें पाहिजे. नाहींतर भारताच्या बाजारपेठेंत त्यांना फारसें स्थान न राहण्याचा धोका आहे. प्रतिनिधि-मंडळांतील दुसरे एक औद्योगिक सल्लागार म्हणाले कीं, हिंदी निर्यात व्यापाऱ्यां-कडून मंडळाकडे निर्यातीविषयीं बऱ्याच विचारणा करण्यांत आल्या. विशेषतः मँगेनीझची माती, अभ्रक व रत्नांचे खडे ह्यांच्या निर्यातीविषयीं चौकशी करण्यांत आली. ह्या मालाला अमेरिकेंत चांगली बाजारपेठ आहे असें मंडळानें सांगितलें. भारत हा लोखंडाच्या मातीच्या बाबतींत फक्त ब्राझीलच्यामागोमाग आहे. भारतामधील लोखंडाच्या मातीचा सांठा २,१०० कोटी टनांचा असावा. आणखी कित्येक वर्षे भारतामधील पोलादाच्या धंद्याला खनिज लोखंडाची टंचाई भासणार नाहीं. त्यामुळें भारतांत पोलादाचा धंदा चांगला भरभराटीस येईल. पण त्यामुळें पोलाद निर्माण करणाऱ्या इतर देशांना भय वाटण्याचें कारण नाहीं. आणखी कितीतरी वर्षे भारताला स्वतःच्या गरजा भागविण्यासाठीच पोलाद निर्माण करावें लागेल.

### युरोपकडून भारताला अधिक मदत मिळण्याचा संभव

डेव्हलपमेंट लोन फंडाचे मॅनेजिंग डायरेक्टर मि. व्हॅन्स ब्रँड ह्यांनीं भारताला मिळूं शकणाऱ्या परदेशीय आर्थिक मदती-संबंधी आपले विचार प्रकट केले आहेत. ते म्हणाले, फंडाकडून मिळालेल्या कर्जाचा उपयोग अमेरिकेंत माल विकत घेण्यासाठीच केला पाहिजे अशी अट घालण्यांत आली आहे. ह्या अटीचा परि-णाम पश्चिम युरोपांतील देशांकडून मिळूं शकणाऱ्या मदतीवरहि होण्याचा संभव आहे. भारत व इतर अर्धविकसित देश ह्यांना पश्चिम युरोपांतील देशांकडून अधिक मदत मिळण्याची शक्यता आतां वाढली आहे. स्वतंत्र देशांत भारताची जागा ही मोक्याची आहे. भारताची ४० कोटींची लोकसंख्या, त्याचें भौगोलिक दृष्ट्या महत्त्वाचें असलेलें स्थान, आणि त्याच्या लोकशाही संस्था ह्यांचा विचार करतां त्याला युरोप खंडाइतकें महत्त्व आलेलें आहे. शिवाय भारतानें सध्यांच खूप आर्थिक प्रगति केलेली आहे आणि अशीच प्रगति करीत राहण्याची शक्तीहि दाखविली आहे. भारतामधील संस्था योग्य अशा पायावर उभारण्यांत आलेल्या आहेत. भारतामधील लोक पुढाकार घेणारे आणि कामसू आहेत. त्यामुळें आर्थिक विकासाची भरारी मारण्याचें सामर्थ्य त्याच्यांत उत्पन्न झालेलें आहे. डेव्हलपमेंट लोन फंडाकडून भारताला जी मदत करण्यांत येईल तिचा चांगल्या रीतीनें उपयोग करण्यांत येईल ह्यांत मुळींच शंका नाहीं. भारताच्या औद्योगिक विकासासाठी परदेशांची मदत पाहिजे आहे, हें मशहूर आहे. पण ह्या द्रव्यसाह्याचा तपशील समजून घेण्यासाठी विकासांतर्गत योजनांची अधिक माहिती करून घेणें अगत्याचें आहे. असें केल्यानें मदत देणाराचें मदतीच्या गरजेचें ज्ञान अधिक खोल होतें.

### ला. इं. कॉर्पोरेशन मालमत्तेच्या गहाणावर कर्जें देणार

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियानें आतां माल-मत्तेच्या गहाणावर कर्जें देण्यास प्रारंभ केला आहे. कॉर्पोरेशन स्थापन झाली, तेव्हां तिच्याकडे पूर्वीच्या विमा कंपन्यांचे व्यवहार आले. त्यांत मालमत्तेच्या गहाणावरील कर्जांचे बरेच व्यवहार होते आणि त्यांपैकी बरेच समाधानकारक नव्हते. म्हणून, कॉर्पोरेशननें गहाणावर नवीं कर्जें न देण्याचें ठरविलें. आतां पूर्वीचे व्यवहार बऱ्याच प्रमाणांत समाधानकारक रीतीनें मिटविण्यांत आले असल्यानें, नवीं कर्जें देण्यास प्रारंभ करण्यांत येत आहे. नव्या योजनेप्रमाणें, कलकत्ता, मद्रास आणि मुंबई येथील मालमत्तेच्या पहिल्या गहाणावरच कर्जें दिलीं जातील. इमारती नव्याच पाहिजेत, असें नाहीं. कर्जफेडीची कमाल मुदत १५ वर्षे राहील. ५ वर्षांपेक्षा कमी मुदतीकरतां कर्ज दिलें, तर कर्जफेडीच्या हप्त्याची सक्ति केली जाणार नाहीं. पण, त्यापेक्षा ज्यास्त मुदतीचीं कर्जें असतील, तर मुद्दलाचा कांहीं भाग हप्त्याहप्त्यांनीं परत केलाच पाहिजे, अशी अट घातली जाईल. खंडानें घेतलेली मालमत्ता असेल तर उरलेली मुदत किमान ३० वर्षे असल्याविना तिचे तारणावर कर्ज दिलें जाणार नाहीं. मालमत्तेच्या किंमतीच्या ५०% पेक्षा जास्त कर्ज मिळणार नाहीं. कर्जाची किमान रक्कम ५ लक्ष रु. असेल. कर्जावर ७% व्याज आकारण्यांत येईल; वक्तशीर परतफेड केली तर व्याजाचा दर ६½% पडेल. प्रस्तुत योजना विद्यमान मालमत्तेच्या गहाणावर कर्ज मिळण्याची आहे; घरें बांधण्यासाठी कर्ज देण्याची कॉर्पोरेशनची नुकतीच जाहीर झालेली योजना वेगळी आहे.

**रशिआची शस्त्रकपात**—रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चेव्ह ह्यांनीं रशिअन पार्लमेंटमध्यें भाषण करतांना रशिआनें आपलें सैन्य १२ लाखांनीं कमी करण्याचें ठरविलें आहे, असें सांगितलें. तथापि त्यामुळें रशिआच्या लष्करी सामर्थ्यांत कांहीं कमतरता येणार नाहीं. रशिआ एक विलक्षण शस्त्र बनवीत असल्याचेंहि ते म्हणाले.

**मध्यप्रदेशांतील खताचा कारखाना** – तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत मध्यप्रदेशांत काढण्यांत यावयाच्या खताच्या कार-खान्याची जागा आतां निश्चित करण्यांत आली आहे. कारखाना इटारसीजवळ काढण्यांत येईल. कटनीजवळचीहि एक जागा पाहण्यांत आली. ह्याबाबतच्या तज्ज्ञांच्या समितीचा अहवाल आतां मध्यवर्ती सरकारकडे पाठविण्यांत येईल.

### नियोजनावर चीनच्या आक्रमणाची छाया

अमेरिकेंतील न्यूयॉर्क टाइम्स या वृत्तपत्रानें, चीनच्या भारतावरील आक्रमणामुळें भारताच्या आर्थिक नियोजनांवर कसा परिणाम होईल ह्यासंबंधीं विवेचन केलें आहे. ह्या विषयासंबंधीं त्या वृत्तपत्रानें ४५ पानांची एक स्वतंत्र पुरवणीच प्रसिद्ध केली आहे. त्यांत असें प्रतिपादन करण्यांत आलें आहे कीं, नवीन वर्षाच्या प्रारंभीं भारताला एक प्रकारच्या कुंचबणेला तोंड द्यावें लागत आहे. भारताच्या उत्तर सरहद्दीवर चीननें आक्रमण केल्यामुळें आपली दुसणाईत अर्थव्यवस्था सुधारण्याच्या भारताच्या प्रयत्नांना मोठा धक्का बसला आहे. उत्तर सीमेवरील हा धोका कांहीं वर्षे तरी चालूच राहील असा भारत सरकारचा अंदाज आहे. त्यामुळें भारी उद्योगधंद्यांची वाढ करून देशाची संरक्षणव्यवस्था बळकट करण्याशिवाय सरकारला मार्ग राहिलेला नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालखंडांत संरक्षणव्यवस्थेवरील खर्च दरसाल ५० कोटी डॉलर्सपर्यंत ठेवतां येईल असा भारत सरकारचा अंदाज होता. पण, आतां मात्र नियोजन मंडळाचे तज्ज्ञ व अर्थखातें अधिक उत्पन्न देणाऱ्या बाबी शोधूं लागलें आहे. कारण, संरक्षणावरील खर्च वाढत जाईल अशी भीति त्यांना वाटूं लागली आहे. तथापि चीनचें आक्रमण भारताला एका अर्थानें वरदान ठरण्यासारखें आहे. भारतामधील लोकांना स्वतःच्या असुरक्षिततेची जाणीव आतां अधिक चांगली झाली आहे. त्यामुळें संरक्षणासाठी आवश्यक असणारे भारी उद्योगधंदे उभारण्याच्या कामीं त्यांच्याकडून अधिक त्याग व कष्ट खुषीनें सहन केले जाण्याची शक्यता वाढली आहे. कांहीं झालें तरी भारत सरकार दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा गाभा पूर्ण करण्याचे जास्तींत जास्त प्रयत्न करील ह्यांत शंका नाहीं. परदेशीय मदत मोठ्या प्रमाणावर मिळाली, तर हें शक्य आहे.

---

### हिंदी चित्रपटांची हुंडणावळीची कमाई

सिनेमा फिल्म्सच्या बाबतींत भारत आतां परदेशी हुंडणावळ कमावूं लागला आहे. १९५९ च्या पहिल्या नऊ महिन्यांत, निर्गत केलेल्या फिल्म्सच्या द्वारां भारताला १ कोटी रु. मिळाले. ह्याच मुदतींत, आयात केलेल्या फिल्म्सच्या पायीं ८० लक्ष रु. परदेशीं द्यावे लागले. १९५८ सालचे तत्सम आंकडे अनुक्रमें ९६ लक्ष रुपये आणि ३२ लक्ष रु. असे आहेत. आयात होणाऱ्या फिल्म्स भाड्यानें येतात; परदेशीं जाणाऱ्या फिल्म्सपैकीं कांहीं भाड्यानें पाठविल्या जातात, तर कांहीं विकल्या जातात. सुमारें ६० देशांकडे आपल्या फिल्म्सची आतां निर्गत होते. सिलोन आणि सिंगापूर, हीं आपलीं पूर्वीपासूनचीं मोठीं गिऱ्हाइकें आहेत; त्यांत आतां ग्रेटब्रिटन, रशिया, फ्रान्स, अमेरिका, कॅनडा, इत्यादि देशांची भर पडली आहे. परदेशांत हिंदी फिल्म्स पाठविण्यास मदत व्हावी ह्या दृष्टीनें सिनेमास्कोप चित्रपटांच्या निर्मितीस भारत सरकार उत्तेजन देत आहे आणि सब टायटल्स देणाऱ्या यंत्रसामुग्रीची आयात सुलभ करण्यांत येत आहे.

---

**अन्नधान्याचा प्रश्न**—भारतामधील अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सेवानिवृत्त आय. सी. एस्. श्री. गोरवाला ह्यांनीं उपाय सुचविला आहे. त्यांच्या मतानें सरकारनें शेतकऱ्यांकडून स्वतःच धान्य खरेदी करावें आणि त्याचें वांटप स्वतःच्या दुकानांतूनच करावें. धान्य खरेदी करण्याची मक्तेदारी सरकारनें आपल्याकडेच ठेवावी असेंहि त्यांनीं सुचविलें आहे.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : ४४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षे | : | २¾ टक्के |
| ३ वर्षे | : | ३ टक्के |
| ५ वर्षे | : | ३½ टक्के |
| १० वर्षे | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक



## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.
( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :
भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष
रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष
एकूण ठेवी : रु. १२ कोटी
खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

## मध्यवर्ती सरकारचीं देणीं

मध्यवर्ती सरकारला ज्यावर व्याज द्यावें लागतें, अशा देण्यांत सालोसाल वाढ होत आहे. असें देणें १९५७–५८ अखेर ४,२१६ कोटी रुपये होतें, तें १९५८–५९ अखेर ४,९६४ कोटी रुपये झालें. १९५९–६० अखेर तें आणखी ७७१ कोटी रुपयांनीं वाढून ५,७३५ कोटी रुपयांवर जाईल, असा अंदाज आहे. (हे सर्व आंकडे 'दुरुस्त अंदाजा' चे आहेत. कांहीं 'प्रत्यक्ष' आंकडे पुढें दिले आहेत.) ह्या रकमांपैकी भारतांतच परतफेडीच्या रकमा १९५७–५८ अखेर ४,००५ कोटी रुपयांच्या होत्या. १९५८–५९ अखेर त्या ४,५९३ कोटी रुपये झाल्या आणि मार्च, १९६० अखेर त्या ५,०७४ कोटी रुपये भरतील असा अंदाज आहे.

**१९५८–५९ मधील कर्ज उभारणी :** मध्यवर्ती सरकारनें मे, १९५८ मध्यें १३५ कोटी रुपयांचीं तीन कर्जें उभारलीं, तीं अशीं. (अ) ३¼% बॉन्डस १९६३, (ब) ३¾% नॅशनल प्लॅन बॉन्डस १९६८ व (क) ४% लोन १९७३. कन्व्हर्शन्स व रोख मिळून १४२ कोटी रुपयांचे कर्जरोखे खपले; त्यांपैकी रोखीनें १३२ कोटी रुपये जमा झाले.

ऑगस्ट १९५८ मध्यें सरकारनें एकूण ६० कोटी रुपयांचीं दोन नवीं कर्जें उभारलीं :—(अ) ३½% लोन १९६८ व (ब) ३¾% नॅशनल प्लॅन बॉन्डस १९६७. ह्या दोन्ही कर्जांचे सर्व रोखे प्रथम रिझर्व्ह बँकेनेंच घेतले.

सरकारला कांहीं जुन्या कर्जरोख्यांची रोखीनें परतफेड करावी लागली, तर कांहीं नवीं कर्जें उभारण्यांत आलीं. त्यांची वजावाट केली असतां, १९५८–९ मध्यें मध्यवर्ती सरकारला १८१ कोटी रुपये कर्ज निव्वळ नवें मिळेल. १९५७–५८ मध्यें अशा रीतीनें ६६ कोटी रुपये मिळाले होते. ह्याच काळांत १०० कोटी रुपयांच्या ॲड हॉक ट्रेझरी बिलांचें ४% १९७३ च्या कर्जरोख्यांत रूपांतर करण्यांत आलें. हे सर्व कर्जरोखे रिझर्व्ह बँकेनें घेतले आहेत. ते बाजारांत विक्रीसाठी येणार नाहींत.

**१९५९–६० मधील कार्यक्रम :** १९५९–६० च्या अंदाजपत्रकांत २२५ कोटी रुपयांच्या कर्जउभारणीचा उल्लेख आहे. जुन्या कर्जरोख्यांच्या रोखीनें परतफेडीसाठी ११७ कोटी रुपयांचा विनियोग झाल्यावर, नवी निव्वळ कर्जउभारणी १०८ कोटी रुपयांची होईल. जनतेला ट्रेझरी बिलें विकून १५ कोटी रुपये जमविण्याचा सरकारचा विचार आहे. १ जुलै, १९५९ रोजीं मध्यवर्ती सरकारनें १७५ कोटी रुपयांचीं दोन कर्जें उभारलीं—(अ) ३¾% बॉंडस १९६९ व (ब) ४०% लोन १९७९. एकूण १८३.८ कोटी रुपयांच्या रोख्यांस मागणी आली, त्यांपैकी ९४.४ कोटी रुपये रोखीनें जमा झाले. बाकीचे जुन्या कर्जरोख्यांच्या कन्व्हर्शनसचें होतें.

**मध्यवर्ती सरकारची किफायतशीर जिंदगी :** मध्यवर्ती सरकारच्या व्याज द्याव्या लागणाऱ्या कर्जांचा हा हिशेब झाला. कांहीं रकमांवर सरकारला व्याज भरावें लागतें, तसें कांहीं रकमांवर सरकारला तें कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत मिळतेंहि. मार्च, १९५९ अखेर भारत सरकारची उत्पन्नदायी जिंदगी ३,९९९ कोटी रुपयांची होती. मार्च, १९५८ अखेरचे मानानें ही जिंदगी ६०३ कोटी रुपयांनीं जास्त होती. ह्या ६०३ कोटी रुपयांच्या वाढीची फोड अशी आहे. राज्यसरकारांनीं दिलेल्या कर्जांत ३४७ कोटी रुपयांची वाढ झाली; १४२ कोटी रुपये व्यापारी व औद्योगिक उपक्रमांत गुंतविण्यांत आले, १२८ कोटी रुपयांचें भांडवल रेल्वेला पुरविण्यांत आलें आणि २२ कोटी रुपये इतर व्यापारी खात्यांना कर्जाऊ देण्यांत आले. स्टर्लिंग पेन्शनांच्या वर्षासनांच्या खरेदीसाठी ३५ कोटी रुपये खर्ची पडले. १९५९–६० मध्यें सरकारच्या उत्पादक जिंदगीमध्यें आणखी ५७५ कोटी रुपयांची भर पडून उत्पन्न देणारी जिंदगी ४,५७४ कोटी रुपये होईल असा अंदाज आहे.

**मध्यवर्ती सरकारच्या कर्जाची छानना :** मार्च, १९५९ अखेर, सरकारनें रुपयांच्या चलनांत फेडावयाचें कर्ज (व्याज द्यावें लागणारें सर्व कर्ज, वजा ठेवी व परदेशांतील कर्जे, अधिक चालू व बंद कर्जांच्या शिलका) ४,६१५ कोटी रुपये भरले. मार्च, १९५८ अखेर तें ४,११८ कोटी रुपये होते. ह्यांपैकी, रुपयाच्या चलनांतील कर्जे २,१८१ कोटी रुपयांचीं म्हणजे ४७% होतीं. ट्रेझरी बिलें १,२२५ कोटी रुपयांचीं आणि अल्पबचत ७७.२ कोटी रुपयांचीं, म्हणजे अनुक्रमें २७% व १७% होती. परदेशांतील कर्ज १९५६ पासून एकसारखें वाढत चाललें आहे; तें १९५८–५९ मध्यें १८९ कोटी रुपयांनीं वाढून ३९१ कोटी रुपये झालें. रुपयांच्या चलनांतील कर्जरोखे १० वर्षांपेक्षा जास्त मुदतीचे अधिकाधिक होत आलें आहेत. ३०० कोटी रुपयांच्या ॲडहॉक ट्रेझरी बिलांचें ४% लोन १९७३ ह्या कर्जांतील रूपांतराचा तो मुख्यतः परिणाम आहे. १० वर्षांपेक्षा जास्त मुदतीच्या कर्जांचें प्रमाण १९५७–५८ अखेर ५% होतें तें १९५८–५९ अखेर त्यामुळें २८% झालें. ५ ते १० वर्षे मुदतीच्या कर्जांचें प्रमाण ३७% वरून २७% वर उतरलें.

**अल्पबचत योजना :** १९५८–५९ मध्यें सबंध भारतांत अल्पबचत योजना ७८ कोटी रुपये देईल, असा अंदाज आहे; १९५७–५८ मधील वसुली ६९ कोटी रुपये होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पहिल्या तीन वर्षांत अल्पबचत योजनेच्या द्वारां सरकारला २०६ कोटी रु. मिळाले. म्हणजे वार्षिक सरासरी ६९ कोटी रु. पडली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत दरसाल १०० कोटी रु. मिळावे, असें लक्ष्य ठेवण्यांत आलेलें आहे. अल्पबचत योजना लोकप्रिय करण्यासाठी १९५८-५९ मध्यें आणखी कांहीं सुधारणा करण्यांत आल्या. चेकनें रकम काढण्याची सोय प्रथम मुंबईत सुरू करण्यांत आली; ती आतां आणखी कांहीं निवडक पोस्टांतून चालू करण्यांत आली आहे. आठवड्यांतून दोनदां पैसे काढण्याची सवलत सगळ्या पोस्टांत सुरू केलेली आहे. चेकनें ठेवी स्वीकारण्यासहि प्रारंभ झाला आहे. नॅशनल प्लॅन सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांतील गुंतवणुकीची कमाल मर्यादा वाढविण्यांत आली आहे. क्युम्युलेटिव्ह टाइम डिपॉझिट योजना २ जानेवारी, १९५९ पासून अंमलांत आली आहे.

अल्पबचतीच्या योजनेनें जमलेल्या एकूण रकमेपैकी ४८ कोटी रुपये राज्यसरकारांना १९५६–५९ मध्यें देण्यांत आले; १९५७–५८ मध्यें ४० कोटी रुपये देण्यांत आले होते. १९५७–५८ मध्यें प्रत्येक राज्यांतील अल्पबचतीची जमा रकम त्या त्या राज्यानें उभारलेल्या कर्जाच्या रकमेंत मिळवून त्यांतून मध्यवर्ती सरकारनें व राज्य सरकारनें १ : २ ह्या प्रमाणांत रकमा वाटून घेतल्या. राज्य सरकारांना प्रलोभन म्हणून, हें प्रमाण त्यांना अधिक फायदेशीर करण्यांत आलें आहे. त्यांनीं उभारलेलें सर्व कर्ज त्यांना मिळावें आणि त्यांनीं

जमविलेल्या अल्पबचतीपैकीं दोनतृतीयांश रक्कम त्यांनीं घ्यावी, अशी नवी योजना आहे.

जून १९५९ असेरच्या तिमाहींत अल्पबचत योजनेच्या द्वारां एकूण जेवढी रक्कम गुंतविली गेली, तिच्या ६२ टक्के रक्कम एकट्या मुंबई राज्यांतून जमा झाली. सबंध भारतांत मिळून ७,७८,७७,००० वर्षीच्या तिमाहींत मुंबई राज्यानें ३,१७,३७,००० रु. जमविले होते.

**ट्रेझरी बिल :** १९५७–५८ मध्यें ट्रेझरी बिलांत ४५ कोटी रुपयांची वाढ झाली होती, तर १९५८–५९ मध्यें ट्रेझरी बिलांत ७० कोटी रुपयांची घट होऊन त्यांत १२२५ कोटी रुपयांचें देणें राहिलें. जुलै, १९५८ मध्यें ३०० कोटी रुपयांच्या ट्रेझरी बिलांचें गेल्यांत रूपांतर केलें, तें हिशेबांत घेतलें, तर ७० कोटी रुपयांच्या घटीऐवजीं २३० कोटी रुपयांची वाढच दिसून आली असती.

**राज्य सरकारांचीं देणीं :** राज्य सरकारांच्या देण्यांत १९५८–५९ मध्यें ३०६ कोटी रुपयांची वाढ होऊन त्यांचीं एकूण देणीं २,०५९ कोटी रुपये झालीं. ही वाढ मुख्यतः मध्यवर्ती सरकारकडून घेतलेल्या कर्जांमुळें झाली; हीं कर्जें २३० कोटी रुपयांनीं वाढून १,५६१ कोटी रुपये झालीं. बाजारांत उभारलेलीं कर्जें, इतर कांहीं कर्जें, ह्यांतहि ६१ कोटी रुपयांची भर पडली. तात्पुरतीं कर्जें ६ कोटी रुपयांनीं कमी झालीं.

**१९५८–५९ मधील उभारणी :** १९५८ मध्यें आसाम, पंजाब आणि काश्मीर हीं राज्यें वगळून बाकी सर्व राज्यांनीं ५० कोटी रुपयांसाठी बाजारांत मागणी केली. सर्व कर्जें ४½% दराचीं व एक वगळून बाकी सर्व कर्जें १२ वर्षें मुदतीचीं होतीं. कर्जासाठी ६५·८४ कोटी रुपयांचे अर्ज आले, त्यांपैकी ५४·४२ कोटी रुपयांचे अर्ज स्वीकारून तेवढ्या रकमेचे गेल्ले देण्यांत आले. ५·२४ कोटी रुपये कन्व्हर्शनच्या स्वरूपांत मिळाले. ३·१९ कोटी रुपयांची कर्जफेड केली. अशा रीतीनें, राज्य सरकारांना निव्वळ ४५·९९ कोटी रुपयांचें कर्ज हातांत पडलें.

**भारत सरकारचीं व्याज द्यावें लागणारीं कर्जें व व्याज मिळवून देणारीं येणीं**

**( १९५९–६० च्या अंदाजपत्रकाप्रमाणें )**

| अ—व्याज द्यावें लागणारीं कर्जें | (आंकडे कोटी रुपयांचे) |
|---|---|
| भारतांत— | |
| १ कर्जें | २,२९२·२५ |
| २ ट्रेझरी बिलें, इत्यादि | १,५३५·१२ |
| ३ अल्प बचत | ८६०·६२ |
| ४ घसारा व रिझर्व्ह फंड | ९७·०७ |
| ५ इतर | २८८·०३ |
| ६ एकूण | ५·०७३·७९ |
| इंग्लंडमध्यें— | |
| ७ कर्जें | ५८·११ |
| ८ इतर | १३·३३ |
| ९ एकूण | ७१·४४ |
| १० डॉलर कर्जें | ४३०·८७ |
| ११ रशियाकडून | ६१·३४ |
| १२ जर्मनीकडून | ६४·६६ |
| १३ इतर | ३२·७९ |
| ब—व्याज मिळवून देणारीं येणीं | ५,७३४·८९ |
| १४ रेल्वेजना दिलेलें भांडवल | १,४६५·१२ |
| १५ इतर व्यापारी खात्यांना दिलेलें भांडवल | २०९·३७ |
| १६ व्यापारी उपक्रमांत गुंतवणूक | ४६१·०० |
| १७ राज्यांना दिलेलीं कर्जें व इतर कर्जें | २,११८·५६ |
| १८ बर्मा व पाकिस्तानकडून येणीं | ३००·०० |
| १९ स्टर्लिंग पेन्शनांची वर्षासनांची खरेदी | २०·०३ |
| क-व्याज देणारी एकूण जिंदगी | ४,५७४·०८ |
| २० ट्रेझरी खातीं रोकड व रोखे | ५५·७६ |
| २१ ज्यावर व्याज द्यावें लागतें पण मिळत नाहीं अशी रक्कम | १,१०५·०५ |

**भारत सरकारच्या कर्जांचा तपशील ( कोटी रुपये )**

| मार्च असेर | रुपी लोन्स | एकूणाशीं प्रमाण % | ट्रेझरी बिलें | एकूणाशीं प्रमाण % | अल्प बचत | एकूणाशीं प्रमाण % | इतर देणीं | एकूणाशीं प्रमाण % | एकूण | वाढ अथवा घट– | परदेशांतील कर्ज | पैकीं डॉलर कर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५१ | १,४३८·४६ | ५८·२ | ३६४·७२ | १४·८ | ३२६·२५ | १३·२ | ३४२·८१ | १३·९ | २,४७२·२४ | +२·३ | ४९·८१ | २४·६० |
| १९५६ | १,५०८·६७ | ४९·२ | ५९५·२५ | १९·४ | ५७२·९६ | १८·७ | ३९०·२९ | १२·७ | ३,०६७·१७ | +७·८ | १३८·८१ | ११७·५७ |
| १९५७ | १,६३३·६१ | ४६·६ | ८३५·७० | २३·८ | ६३१·९५ | १८·० | ४०६·५५ | ११·६ | ३,५०७·८१ | +१४·४ | १६०·९८ | १३२·९५ |
| १९५८ | १,६९९·५० | ४१·३ | १,२९५·१२ | ३१·५ | ७००·६७ | १७·० | ४२२·३७ | १०·३ | ४,११७·६६ | +१७·४ | २११·०२ | १५९·८५ |
| १९५९ | २,१८०·९६ | ४७·३ | १,२२५·३२ | २६·५ | ७७१·६७ | १६·७ | ४३७·२० | ९·५ | ४,६१५·१५ | +१२·१ | ३९१·३५ | २६२·३१ |

**राज्य सरकारांची कर्जविषयक परिस्थिति ( लक्ष रुपये )**

| | १९५१–५२ असेर | १९५५–५६ असेर | १९५६–५७ असेर | १९५७–५८ असेर | १९५८–५९ असेर |
|---|---|---|---|---|---|
| कायम कर्जें | १३३,७१ | २६४,४८ | २७३,९५ | २८६,५१ | ३४६,८१ |
| फ्लोटिंग कर्ज | १५,६६ | ८,२० | १९,८८ | २२,९० | १६,८६ |
| मध्यवर्ती सरकारकडून घेतलेलं | २३८,५४ | ८७६,०७ | १०९४,९१ | १३३१,३९ | १५६१,०९ |
| इतर | — | | ३,२० | ८,९२ | २६,३४ |
| अनफंडेड कर्ज | ५७,३७ | ८३,१९ | ९४,०९ | १०३,१० | १०७,४३ |
| एकूण कर्ज | ४४५,२८ | १२३१,९४ | १४८५,०३ | १७५२,८२ | २०५८,५३ |

## भारताच्या आर्थिक स्थितींत १९५८–५९ मध्यें सुधारणा

भारतांत १९५८–५९ मध्यें देशाला आर्थिक व्यवहाराच्या बाबतींत पूर्वीप्रमाणेंच बराच ताण सहन करावा लागला तरी १९५७–५८ तल्यापेक्षा सदर वर्षात सुधारणा झाल्याचें कोलंबो योजना सल्लागार समितीच्या १९५८–५९ च्या वार्षिक अहवाळांत म्हटलेलें आहे. परकीय चलनाच्या गंगाजळींत घट होण्याचें प्रमाण विशेषत्वानें कमी झाल्याचें आणि त्यामागील वर्षापेक्षा सदर वर्षात अर्थसंकल्पीय तूटहि पुष्कळच कमी झाल्याचें त्यांत निदर्शनास आणून देण्यांत आलें आहे. मध्यवर्ती सरकारच्या आणि राज्य सरकारांच्या अर्थसंकल्पांत १९५७–५८ मध्यें दिसून आलेल्या ४९९ कोटी रुपयांच्या तुटीशी तुलना करतां सदर वर्षांत बरीच कमी म्हणजे १५६ कोटी रुपयेच तूट दिसून आली.

सन १९५८–५९ मधील आर्थिक आणि भांडवली कार्यक्रमांचें स्वरूप मुख्यत्वें त्यामागील वर्षाप्रमाणेंच होतें. उपलब्ध साधनसंपत्ति आणि त्यावरील मागण्या यामधील विषमता कमी करण्याचा प्रयत्न होता. साधनसामग्रींत आणखी वाढ करण्याच्या दृष्टीनें करविषयक धोरण आंखण्यांत आलेलें होतें. सट्टेबाजीसाठी शेअर ठेवण्यास प्रतिबंध व्हावा पण भांडवल गुंतविण्यास चालना यावी असें धोरण नाणें संबंधांत आंखलेलें होतें. व्यापार आणि परकीय चलन या क्षेत्रांतील धोरण आयातीवर निर्बंध घालण्याचें व निर्यातीस चालना देण्याचें होतें. तसेंच सदर वर्षात दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अंतर्गत व परदेशीय साधनसंपत्तीचें पुन्हा मूल्यमापन करण्यांत आलें व उपलब्ध साधनांत भागविण्याच्या दृष्टिनें या योजनेच्या खर्चांत जरूर ते फेरबदल करण्यांत आले. सदर वर्षात आर्थिक दृष्टिकोनांत विशेष सुधारणा दिसून आली खरी तरी आर्थिक घडीवर विशेष ताण पडूं न देतां विकास कार्याचा वेग कसा वाढवावा हा प्रश्न बाकी होताच.

### उत्पादन

सन १९५८–५९ मध्यें धान्योत्पादन १९५७–५८ तल्या उत्पादनाशीं तुलना करतां १८ टक्क्यांनीं (एकूण ७·३५ कोटी टन) आणि १९५६–५७ तल्या उच्चांकापेक्षा ७ टक्क्यांनीं वाढलें. १९५८–५९ मध्यें ३४ लक्ष टन धान्य आयात करावें लागलें. १९५७–५८ मधील हाच आंकडा ३६ लक्ष टन होता. एकंदरींत या वर्षात अन्नधान्य अधिक प्रमाणांत उपलब्ध होतें. व्यापारी पिकांच्या उत्पादनांतहि या वर्षात बरीच वाढ झाली. शेतकी उत्पादनाचा एकूण निर्देशांक (३० जून १९५० ला संपलेलें वर्ष = १०० धरून) १९५६–५७ मध्यें १२३·६ होता. तो १९५८–५९ मध्यें १३१ वर गेला. यांपैकीं अन्नधान्यांचा निर्देशांक १२८·२ तर इतर शेतकी उत्पादनाचा निर्देशांक १३६·६ असा आहे.

### उद्योगधंदे

सन १९५७–५८ मध्यें औद्योगिक उत्पादनांत आदल्या वर्षाशीं तुलना करतां फक्त १·७ टक्काच वाढ झाली होती. सदर वर्षात हा वेग अधिक वाढल्याचें दिसून येतें. औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक (मूळ प्रमाण १९५१ = १०० धरून) १९५६–५७ मध्यें १३५·६ होता तो १९५८–५९ मध्यें १४१ वर गेला.

अहवालाच्या या वर्षात कागद, सल्फ्यूरिक अॅसिड, कॉस्टिक सोडा, सुपर फॉस्फेटस् रंग, आगकाड्या रेयॉनचें सूत, सिमेन्ट, अॅल्युमिनियम, शिवण्याचीं यंत्रें, विजेचे पंखे, सायकली, घरगुती वापरासाठी अवजारें, रेफ्रिजरेटर्स, यांसारख्या धंद्यांच्या निर्धारित उत्पादनशक्तींत बरीच वाढ झाली. या वर्षात चालू पोलाद कारखान्यांचे विकास कार्यक्रम पूर्णावस्थेस जात होते आणि त्यामुळें १९५९–६० मध्यें पोलाद–उत्पादन सुमारें ५ लाख टनांनीं वाढण्याची अपेक्षा आहे.

### किंमती

सन १९५६–५७ च्या प्रारंभीं घाऊक किंमतीचा सर्वसाधारण निर्देशांक (१९५२–५३=१०० धरून) ९८ होता तो या वर्षाअखेर १०६ वर गेला.

### देण्याघेण्याची परिस्थिति

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीपासून आपली देण्याघेण्याची परिस्थिति एकंदरींत गंभीरच राहिली आहे. १ एप्रिल १९५६ रोजीं म्हणजे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीला रिझर्व्ह बँकेची परदेशांतील मालमत्ता ७४६·१ कोटी रुपये इतकी होती. परंतु मार्च १९५९ च्या बेतास हा आंकडा २१३·१ कोटी रुपये आला.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षात अशी घसरगुंडी होण्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे व्यापारांत मोठ्या प्रमाणावर आलेली तूट. हा आंकडा १९५५–५६ मधील १२१·२ कोटी रुपयांवरून १९५८–५९ मध्यें ४७०·४ कोटी रुपयांवर गेला.

### आयात–निर्यात

सन १९५६–५७ मध्यें एकूण १०९९·५ कोटी रुपये किंमतीच्या मालाचा आयात झाली. हा आंकडा १९५७–५८ मध्यें १०४·७ कोटी रुपयांनीं वाढला. परंतु १९५८–५९ मध्यें तो परत १५७·७ कोटी रुपयांनीं कमी झाला आहे. या वर्षात निर्यातीच्या परिस्थितींत घसरगुंडी दिसून आली. १९५६–५७ व १९५७–५८ मध्यें निर्यातीपासून अनुक्रम ६३५·२ व ५९४·७ कोटी रुपये उत्पन्न झालें होतें. हा आंकडा १९५८–५९ मध्यें आणखी १८·६ कोटी रुपयांनीं कमी झाला आहे.

### परदेशांचें साह्य

एप्रिल १९५६ च्या सुरुवातीपासून जुलै १९५९ अखेरपर्यंत भारतास परदेशांकडून कर्जे व मदतीच्या स्वरूपांत ११०९·२ कोटी रुपयांचें साह्य मंजूर झालें. त्याचप्रमाणें पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील १९३·४ कोटी रुपयांची अशी रक्कमहि आपल्या हाताशीं होती. म्हणजेच जुलै १९५९ अखेर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी आपल्याला १३०२·६ कोटी रुपयांचें परकीय साह्य उपलब्ध होतें. यांत आंतरराष्ट्रीय बँक व पांच परदेशी सरकारांचे मिळून २५ कोटी पौंड साह्य समाविष्ट आहे.

### रोजगार

देशांत बेकारीचें प्रमाण किती आहे त्याची कल्पना निरनिराळ्या उद्योगविनिमय केंद्रांकडून मिळणाऱ्या आंकडेवारीवरून कांहींशी येऊं शकते. मार्च १९५८ मध्यें अशीं १९७ केंद्रें होतीं. मार्च १९५९ अखेर हा आंकडा २२३ वर गेला होता. या केंद्राच्या यादीवर मार्च १९५८ मध्यें ९,३२,००० जणांचीं नांवें होतीं. त्यांत वाढ होत होत मार्च १९५९ च्या मार्चअखेर ही संख्या १२,१७,००० वर गेली. केंद्राकडे रिकाम्या जागा

कळविण्याचें प्रमाणहि वाढतें होतें. १९५८–५९ मध्यें एकूण ३,७२,००० जागा भरण्याच्या कामीं केंद्रांचें साह्य घेण्यांत आलें होतें. एकंदरींत विचार करतां नोकऱ्या अधिकाधिक प्रमाणांत उपलब्ध होत आहेत हें खरें असलें तरी नोकरी पाहूं इच्छिणाऱ्यांची संख्या या वाढीपेक्षा अधिक असल्यामुळें बेकारांच्या संख्येंत भर पडलेली दिसते.

### आर्थिक धोरणें व उपाययोजना


अहवालाच्या वर्षांत देशाचें आर्थिक धोरण आदल्या वर्षाप्रमाणेंच होतें. देण्याघेण्याच्या परिस्थितीवर पडणारा ताण कमी करणें, किंमती विशेषतः अन्नधान्यांच्या किंमती रोखणें आणि देशांतर्गत साधनसामग्रींत वाढ करून विकासासाठी अधिक साधनसंपत्ति उपलब्ध करणें हेंच सूत्र याहि वर्षी पुढें ठेवण्यांत आलें होतें.

या दृष्टीनें निर्यात वाढीसाठी अनेक उपाय योजण्यांत आले. आयातीवरील बंधनें चालूच ठेवण्यांत आलीं. धान्याच्या तारणावर देण्यांत येणाऱ्या कर्जावरील नियंत्रणें चालूच ठेवण्यांत आलीं. धान्य खरेदी करून सरकारी सांठा वाढविण्याचे प्रयत्न चालूच होते तसेंच स्वस्त धान्यांच्या दुकानांची संख्याहि वाढविण्यांत आली. १९५८ अखेर देशांत रास्त दरानें धान्य विकण्यासाठी अशीं ४५,००० दुकानें होतीं व त्यांतून २३·७ लक्ष टन धान्य विकण्यांत आलें.

### भावी काळाविषयीं अपेक्षा

आतांच्या लक्षणांवरून पाहतां दुसऱ्या योजनेंत संकल्पिल्याइतका एकूण खर्च होईलसें वाटतें. पहिल्या योजनेंत राष्ट्रीय उत्पन्नाशीं भांडवल गुंतवणुकीचें पडणारें प्रमाण ५ टक्क्यांवरून ७ टक्क्यांवर गेलें. यांत वाढ होत होत तें आतां १० ते ११ टक्क्यांच्या दरम्यान गेलें आहे.







हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.